जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०२/०५/२०२४
## दि.०१/०५/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे.१२०/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,मोटार वाहन कायदा १३४(अ)(ब),१८४ |
| **फिर्यादी** | दिनेश देवकुळे, वय ३४ वर्षे,रा.मंगळवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | लाल रंगाचा माल वाहतुक करणारा ट्रकचालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०४/२०२४ रोजी रात्रौ १०/३० वाजताचे सुमारास मालधक्का चौक, पुणे येथे. |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा भाचा विवेक संजय कसबे वय २१ वर्षे रा.कचरेवस्ती मुंढवा पुणे हा पायी जात असतांना त्यास जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.संदिप मधाळे मो.नं.९४२२४२४७७८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे.४३१/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,३३७,३३८,मो.वा.का.क.१८४ |
| **फिर्यादी** | दत्तात्रय वारघडे वय ३५ वर्षे,रा.गणेशनगर ता.हवेली जि.पुणे |
| **आरोपीत** | ट्रक चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०२४ रोजी सायंकाळी १९/३० वा चे सुमारास मौजे लोणीकंद ता हवेली जि पुणे गावचे हददीत मगरवस्ती येथील सुनिल वाळुंज याचे हॉटेल समोर लोणीकंद केसनंद रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा पुतण्या रोहीत काळुराम वारघडे वय २५ वर्षे रा.बकोरी ता.हवेली जि.पुणे हा चालवत असलेल्या बुलेट मोटार सायकलला जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.वैजीनाथ केदार मो.नं.८१०४०६६७१६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे.९६/२०२४,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४८ वर्षे,रा.शनिवार पेठ,डी.एस.के चितांमणी फ्लॅट नं.१८,पाचवा मजला,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/०५/२०२४ रोजी पहाटे ०५/३० वा.दरम्यान न्यु त्रिशुल हॉलमार्कीग सेंन्टर,गुरुप्रसाद अपार्टमेंन्ट,रविवार पेठ,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी याचे न्यु त्रिशुल हॉलमार्कीग सेंन्टर या दुकाना मधून २०४ ग्रॅम ४९ मिली वजनाचे एकुण १३,४९,६३४/-रुपये किमंतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेलेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अरविंद शिंदे मो.नं.९२८४११८०१८ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** सिंहगड पो स्टे.२६१/२०२४,भादविक ४३५

**फिर्यादी** एक महिला वय ४२ वर्षे,रा.वडगाव बु पुणे

**आरोपीत** फिर्यादी यांचा जावई (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०५/२०२४ रोजी सकाळी ०२/१५ वा सुमारास कॉर्पोरेशन बिल्डींग,ज्ञानगंगा सुविधा बिल्डींग शेजारी,वडगाव बु सिंहगडरोड पुणे येथे पार्किंग मध्ये

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा जावई यांने फिर्यादी यांचे मुली सोबत असलेल्या वादामुळे फिर्यादीला हानी पोहचविण्याच्या उद्देशाने वर नमुद केले ता.वेळ व ठिकाणी फिर्यादी यांचे राहते बिल्डींग चे पार्किंग मध्ये पार्क केलेली फिर्यादी यांची ज्युपिटर गाडी पेटवुन देवुन त्या आगीने शेजारी पार्क केलेल्या इतर १४ दुचाकी वाहने पेटवुन अंदाजे ३,४२,०००/- रुपये किंमतीचे नुकसान केले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी.अमोल मालुसरे मो.नं.८६६८२८०११७

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** चंदननगर पो स्टे.२०९/२०२४,भादविक ३०९

**फिर्यादी** मुकेश अशोक पानपाटील, पोलीस अमंलदार नेमणुक चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर

**आरोपीत** एक इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०५/२०२४ रोजी दुपारी १२/३० वाजण्याचे सुमारास महात्मा फुले पोलीस चौकी येथे

**तपशिल** यातील नमुद इसम याचे सासु सासरे हे त्याचे बायकोस त्याचे बद्दल काही सांगतात म्हणून ती त्याचे सोबत नांदायला येत नाही याचा राग मनात धरून बायको व तीचे आई वडील यांना जाब विचारण्या करिता घरी गेला असता तिथे ते न मिळाल्याने व पो.चौकीत असल्याचे कळल्याने त्या ठिकाणी येवून त्याने प्लास्टीकचे बॉटलमधुन स्वतःचे अंगावर पेट्रोल सारख्या ज्वलनशील पदार्थ ओतुन घेवुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी.पालवे मो.नं.९५०३९४१५४२

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** भारती विद्यापीठ पो स्टे.३६६/२०२४,भादविक ४०६,४२०,३४

**फिर्यादी** एक महिला वय ३४ वर्षे रा.कर्वेनगर,पुणे

**आरोपीत** तीन इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक१६/०२/२०२४ ते दिनांक ११/०४/२०२४ रोजी पर्यंत नमुद इसम १ व २ यांचे राहते घरी

**तपशिल** यातील फिर्यादी यांना यातील नमुद इसम एक याने तो स्वतः मुंबई मंत्रालयात क्लार्क पदावर नोकरीस असल्याचे ओळखपत्र दाखवून फिर्यादी व त्यांच्या पतीचा विश्वास संपादन करून त्यांना म्हाडा चे स्कीम मधून व्यंकटेश स्काय डेल राजाराम ब्रिज,सिंहगड रोड,पुणे येथे स्पेशल कोटयातील फ्लॅट मिळवून देतो असे सांगितले. तसेच नमुद इसम दोन व मोबाईल वर बोलणारी महिला यांनी नमुद इसम एक याच्यासोबत संगनमत करून म्हाडा स्किम मधुन फ्लॅट मिळवुन देण्याकरता फिर्यादी यांचेकडुन वेळोवेळी बँक आर.टी.जी.एस,इंटरनेट बँकिंग,फोन पे व रोख स्वरुपात एकुण रक्कम २८,०६,५५३/-रु घेवून सदर व्यवहार पुर्णत्वास न नेता फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी.धीरज गुप्ता, मो.नं.९८५०८२०३०७

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** वानवडी पो स्टे.३२४/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक इसम वय ३० वर्ष रा.वानवडी पुणे

**आरोपीत** अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा वर नमुद अनोळखी इसमांनी विश्वास संपादन करुन वेगवेगळे टास्क देवून ते पुर्ण करण्याचे बहाण्याने पार्ट टाईम नोकरीचे अमिष दाखवून त्यांची एकुण १९,८१,६२१/- रुपये इतक्या रकमेची आर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) करणकोट मो.नं.८८७९७०६०८८

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे.७२६/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३५ वर्ष रा. मांजरी बुद्रुक पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक,लिंकचे वापरकर्ते अॅपचे वापरकर्ते यांनी क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉईट व नवीन क्रेडिट कार्ड चालू करुन घेण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांना लिंक डाऊनलोड करण्यास सांगून त्याद्वारे फिर्यादी यांचे मोबाईल फोनचा अॅक्सेस घेऊन प्राप्त झालेले ओटीपी स्वःत वापरुन फिर्यादी यांचे क्रेडिट कार्ड वरुन ३,३५,९४०/- रुपये ट्रान्सफर करुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.संतोष पाढंरे, मो.नं.९९२३१३९७७९ |

**९**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरुड पो स्टे.१२५/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ८८ वर्ष रा.कोथरुड पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पेन्शन करीता स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेचे दोन खाते ओपन केले होते. दि.२०/०२/२०२४ पासुन फिर्यादी हे त्यांचे गुगल पे अॅप चालत नव्हते.त्यामध्ये फिर्यादी यांना बँक खात्याचे युजर आयडी व पासवर्ड बदलण्यास सांगितले होते.त्या करीता फिर्यादी यांनी ऑनलाईन गुगल वर ग्राहक सेवा क्रमांक शोधुन त्या नंबर वर फोन करुन युजर आयडी व पासवर्ड बदलुन घेताना त्यांची ३,८८,०००/-रुपयेची आर्थिक फसवणूक झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विक्रमसिंग कदम मो.नं.८०९७०४७८८८ |

**१०**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे.७२७/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३६ वर्ष रा.शेवाळवाडी हडपसर पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यातील नमुद इसमानी मुंबई ते तैवान असे पाठविलेल्या पार्सल मध्ये एमडीएमए असे अंमली पदार्थ आढळल्याने त्याबाबत मुंबई नार्कोटिक्स येथे केस दाखल केल्याची भिती दाखवून त्यासंदर्भात चौकशी तसेच त्यामध्ये फिर्यादी यांना आरोपी करण्याची भिती दाखवून चौकशी दरम्यान फिर्यादी यांचे बॅक अकाऊंन्टचे संपुर्ण माहिती घेवुन त्यावर इस्टा लोन घेवून तसेच लोनची रक्कम परत करण्याच्या बहाण्याने माझे वरिल बॅक खात्यावरुन तसेच पती यांच्या बॅक खात्यावरुन एकूण १८,४५,०००/- रु घेवुन आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी.(गुन्हे)मोढवे, मो.नं.९८२३१७०२६२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**